MHBU100008782022	दाखल दिनांक	:	०४/०५/२०२२
	नोंदणी दिनांक	:	०४/०५/२०२२
	निकाल दिनांक	:	०१/०८/२०२६
	कालावधी	:	वर्ष , महिने, दिवस ०४ ०२ २८

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मलकापूर जिल्हा बुलडाणा यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : पी.एस.ठाकरे)

नियमित दिवाणी दावा क्र.७०/२०२२ **निशाणी क्र.४९**

शिलाताई उत्तमराव सांबारे,
वय -६५ वर्ष, धंदा - घरकाम,
रा. पंचमुखी हनुमान मंदीराजवळ,
घिर्णी रोड, मलकापूर, ता.मलकापुर जि.बुलडाणा. **... वादी**

-विरुध्द-

सुरेश माधवराव कुळकर्णी,
वय - सज्ञान, धंदा - ......,
रा.१४१३, सदाशिव पेठ, अविष्कार हाईटस,
फ़्लॅट नं.५-४ बी,पुणे विद्यार्थी गृहाजवळ,
एम.पी.कॉलेज, पुणे, ता.जि. पुणे - ४११००००० **...प्रतिवादी**

वादीतर्फे विधीज्ञ :- श्री.एन.बी.धुत वकील

प्रतिवादीतर्फे विधीज्ञ :- पी.एन.पाटील वकील

दावा - रक्कम रुपये ४,००,०००/- वसुल होवून मिळणेसाठी

न्यायनिर्णय

(दिनांक ०१ ऑगस्ट २०२६ रोजी पारीत)

सदरचा दावा वादीने रक्कम रुपये ४,००,०००/- च्या वसुलीसाठी दाखल केला आहे.

०२. **वादीचे संक्षिप्तपणे कथन खालीलप्रमाणेः-**

वादीच्या कथनानुसार ती मलकापुर येथील कायमस्वरूपी रहिवासी असून तिच्या मुली पुणे येथे राहत असल्यामुळे तिचे नेहमी पुण्याला जाणे येणे आहे. तसेच तिचा पुणे येथे प्लॉट असून तिचा प्रतिवादीशी परिचय आहे. प्रतिवादी याने वादीस तो भारतीय स्टेट बँक, पुणे येथे मॅनेजर या पदावर कार्यरत असल्याचे भासवून वादीस कर्जदार शैला बादल हिचा पुणे येथील प्लॉट हर्राशी मध्ये घेण्याबाबत विनंती केली. प्रतिवादी याने शैला बादल हिच्या प्लॉटची किंमत ४ लाख रूपये राहील व त्या किमतीमध्ये प्लॉट दिल जाईल असे वादीस सांगितले. वादी हिने प्रतिवादीवर विश्वास ठेवून वेळोवेळी त्यास बुलढाणा अर्बन को.ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी, मलकापुर मार्फत दि.२४.११.२०२० रोजी ५० हजार, दि.०१.१२.२०२० रोजी ५० हजार, दि.०४.१२.२०२० रोजी ४० हजार, दि.०८.१२.२०२० रोजी २५ हजार, दि.१४.१२.२०२० रोजी २५ हजार, दि.२१.१२.२०२० रोजी ५० हजार, दि.२९.१२.२०२० रोजी ३० हजार, दि.०४.०१.२०२१ रोजी २० हजार, दि.२०.०३.२०२१ रोजी १० हजार व तसेच मलकापुर अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक, शाखा मलकापुर मार्फत दि.१०.०२.२०२१ रोजी १ लाख असे एकूण ४ लाख रूपये प्रतिवादीस एन.एफ.टी.द्वारे दिले आहेत.

०३. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी याने वादीस बँकेमध्ये होत हर्रास होत असलेला प्लॉट तिच्या नावाने एप्रिल २०२१ च्या दरम्यान करून देण्यात येईल असे आश्वासन सुध्दा दिले. प्रतिवादी याने वादी हिला वेळोवेळी सध्या कोरोना परिस्थीती आहे त्यामुळे तिच्या नावाने प्लॉट सध्या करता येत नाही असे सुध्दा सांगितले. शेवटी वादी हिने प्रतिवादीस प्लॉट नावाने करून द्या किंवा तिची रक्कम ४ लाख रूपये परत करण्यास प्रतिवादीस म्हटले असता त्याने वादीस नमूद केलेल्या रक्कमेपोटी रक्कम परत करण्यासाठी त्याचे खाते असलेल्या फेडरल बँक शाखा, पुणे या बँकेचा दि.३०.०९.२०२१ रोजीचा धनादेश क्र.०६६०२५ हा रक्कम ८०

हजार व दि.१५.१०.२०२१ रोजी धनादेश क्र.०६६०२६ हा रक्क्म ८० हजार असे एकूण रक्कम १ लाख ६० हजार भरण्यापोटी वादीस दिले. तसेच सदर धनादेश वटवण्याकरिता जमा केल्यास रक्कम मिळून जाईल असे आश्वासन देखील प्रतिवादी याने दिले.

०४. वादीच्या कथनानुसार तिने सदरचे दोन्ही धनादेश हे तिचे खाते असलेल्या जिजामाता महिला नागरी सहकारी बँक शाखा, मलकापुर येथे जमा केले असता प्रतिवादीच्या फेडरल बँकेच्या खात्यात धनादेश वटविण्याऐवटी पुरेशी रक्कम जमा नसल्याने सदर दोन्ही धनादेश दि.२९.१२.२०२१ व ०४.०१.२०२२ अनादरीत झाले. सदर धनादेश बँकेत सादर केल्याबाबत प्रतिवादीस समजता बरोबर त्याने वादी हिच्याशी संपर्क साधून सदर रक्कम दि.१५.०२.२०२२ पर्यंत देण्याचे आश्वासन दिले. परंतु त्याने दि.२२.०२.२०२२ पर्यंतही ती बाकी असलेली ४ लाख रूपयांची रक्कम वादीकडे आणून दिली नाही. शेवटी प्रतिवादी याने वादी हिच्याशी संपर्क साधून तिच्याविरुध्द धनादेश अनादरित झाल्याबाबत प्रकरण दाखल करू नका, रक्कम पाठवितो अशी विनंती केली असता व तसेच त्याला कॅन्सर सारखा आजार असून तो हुबळी येथे दवाखान्यात भरती असल्याचे असे खोटे सांगितले. त्यामुळे वादी हिचा प्रतिवादीवर विश्वास राहिला नाही. याशिवाय, वादी हिला नुकतेच समजले की, प्रतिवादी हा भारतीय स्टेट बँक येथे मॅनेजर सुध्दा नाही म्हणून त्याने वादीसोबत सुरूवातीपासून धोक्याने, लबाडीने व कपटीने विश्वासघात करण्याच्या वाईट हेतूने वादीस फसविले आहे.

०५. त्यामुळे वादीने प्रतिवादीस दि.१७.०३.२०२२ रोजी तिच्या विधीज्ञांमार्फत रजिस्टर्ड नोटीस पाठवून बाकी असलेल्या रक्कमेची मागणी केली असता प्रतिवादीने संबंधीत पोस्टमॅन याच्याशी संपर्क साधून सदर नोटीसीवर खोटा शेरा मारून त्या नोटीसीचे बंधपाकीट परत पाठविले आहे. वादी हीने प्रतिवादीस दिलेल्या रजिस्टर्ड पत्तयावरच तसेच आधारकार्डवर असलेल्या पत्त्यावर सदरची नोटीस पाठविली असून ती नोटीस प्रतिवादीला दि.१७.०३.२०२२ रोजी त्याच्या व्हॉटसअप क्र.८३०८२२१९०७ या क्रमांकावर देखील पाठवलेली आहे. सदर नोटीस ही प्रतिवादीस मिळालेली असून ती नोटीस त्याने बघितली असल्याचे व्हॉटसअपवर सीन झालेले दिसून येईल. त्यामुळे सदर नोटीस प्रतिवादीस मिळूनही

त्याने वादीस रक्क्म दिलेली नाही म्हणून वादीने ४ लाख रूपये रक्कम वसुलीकरिता प्रतिवादीविरुध्द सदर दावा दाखल केला आहे.

०६. प्रतिवादी हा सदर प्रकरणात हजर झाला व त्याने त्याचा जबाब निशाणी क्र.४० कडे दाखल केला. त्याने दाव्यातील कथन हे नाकारले असून त्याला शैला बादल या नावाच्या व्यक्तीला ओळखत नसून तिचा प्लॉट हर्राशीमध्ये आहे हे देखील माहीत नसल्यामुळे त्याने वादीला सदर प्लॉट घेण्याबाबत कधीही विनंती केली नव्हती. तसेच वादीने तिच्या दाव्यात प्लॉटबाबतचे सविस्तर वर्णन चर्तुःसीमा, शिवार प्लॉट क्षेत्र, प्लॉटच्या बाबतचा सौदापावती करारनामा बाबत काहीही नमूद केले नसून त्या अनुषंगाने कोणतेही दस्त अभिलेखावर सादर केलेले नाही. प्रतिवादीच्या कथनानुसार वादी ही पुणे येथे येतजात होती त्यातून प्रतिवादीची वादीसोबत ओळख झाली. पुढे वादीने प्रतिवादीकडे तिच्या मुलींना पैशांची अडचण अडचण असल्यामुळे वेळोवेळी मदत मागितली. त्यानुसार त्याने वादीस आर्थिक स्वरूपात पैसे घेवून मदत केली असून ते पैसे वादीने प्रतिवादी यांना बुलढाणा अर्बन को.क्रेडीट सोसायटी मार्फत दि.२४.११.२०२० रोजी ५० हजार, दि.०१.१२.२०२० रोजी ५० हजार, दि.०४.१२.२०२० रोजी ४० हजार, दि.०८.१२.२०२० रोजी २५ हजार, दि.१४.१२.२०२० रोजी २५ हजार, दि.२१.१२.२०२० रोजी ५० हजार, दि.२९.१२.२०२० रोजी ३० हजार, दि.२९.१२.२०२० रोजी ३० हजार, दि.०४.०१.२०२१ रोजी २० हजार, दि.२०.०३.२०२१ रोजी १० हजार व दि.१०.०२.२०२१ रोजी १ लाख असे एकूण ४ लाख वादीने टप्पयाटप्पयाने प्रतिवादी परत केले आहेत.

०७. प्रतिवादी याने वादीस दि.३०.०९.२०२१ रोजीचा ०६६०२५ व दि.१५.१०.२०२१ रोजीचा ०६६०२६ या क्रमांकाचे धनादेश कधीही रक्कम परतफेडीकरिता दिले नव्हते व नाही. त्यामुळे वादीचे कोणतेही पैसे प्रतिवादीकडून घेणे नाही. याशिवाय, वादीने सदर धनादेश अनादरित झाल्याबाबत प्रतिवादी विरुध्द परक्राम्य संलेख अधिनियमचे कलम १३८ नुसार कोणतीही कार्यवाही केलेली नाही. केवळ प्रतिवादीच्या साध्या स्वभावाचा

गैरफायदा घेवून व त्याच्याकडून पैसे उकळण्यात यावे या मलीन हेतूने प्रतिवादीविरुध्द सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. सदर दावा दाखल करण्यास वादीस कोणतेही कायदेशीर कारण घडलेले नसून वादीचा दावा हा खोटा व बनावट असून तो फेटाळण्या लायक आहे. त्यामुळे वादीचा दावा हा प्रतिवादीस यास मानसिक त्रास दिल्यामुळे खारीज करून प्रतिवादीस नुकसान भरपाई म्हणून १ लाख रूपये व कोर्ट खर्च म्हणून ५० हजार देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

०८. वादीतर्फे विधीज्ञ श्री.एन.बी.धुत यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे तो स्वतः व त्याचे विधीज्ञ श्री.पी.एन.पाटील हे युक्तीवादावेळी गैरहजर राहीले परंतु त्यांनी निशाणी क्र.४८ कडे लेखी युक्तीवाद सादर केला. दाव्यातील वादी व प्रतिवादीच्या कथनांच्या आधारे सदर प्रकरणात खालीलप्रमाणे मुद्दे काढण्यात आले व त्याचे निष्कर्ष मी हे कारणमीमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

अ.क्र.	**मुद्दे**		**निष्कर्ष**
१.	वादी हिने प्रतिवादीस हार्राशीतील प्लॉट विकत घेण्याकरिता रक्कम रुपये ४,००,०००/- दिल्याचे हे सिध्द करते काय?	:	होकारार्थी
२.	वादी हिने प्रतिवादीने अंशतः परतफेड म्हणून प्रत्येकी ८० हजार रूपये रक्कमेचे दोन धनादेश तिच्या नावे दिल्याचे सिध्द करते काय?	:	होकारार्थी
३.	प्रतिवादीने वादीस पैशाच्या स्वरूपात आर्थिक मदत केल्याचे व वादीने ते पैसे वादीने टप्पयाटप्पयाने त्यास परत केल्याचे सिध्द करतो काय ?	:	नकारार्थी
४.	वादी ही प्रतिवादीकडून ४,००,०००/- रक्कम १२% वार्षिक दराने व्याजासह वसूल करण्यास पात्र आहे काय ?	:	अंशतः होकारार्थी
५.	आदेश व हुकुमनामा काय ?	:	अंतिम आदेशा नुसार

०९. **वादीने खालीलप्रमाणे दस्ताऐवज सादर केलेले आहेतः-**

अनु.क्र.	**दस्ताऐवज**	**निशाणी**
१.	दि.३०.०९.२०२१ रोजीचा फेडरल बँकेचा अस्सल धनादेश	१७
२.	दि.०४.०१.२०२२ रोजीचा धनादेश रिर्टन मेमो	१८
३.	दि.१५.१०.२०२१ रोजी फेडरल बँकेचा अस्सल धनादेश	१९
४.	दि.२९.१२.२०२१ रोजीचा धनादेश रिर्टन मेमो	२०
५.	दि.१६.०३.२०२२ रोजीची नोटीसीची स्थळप्रत	२१
६.	अस्सल पावती	२२
७.	सिलबंद लिफाफा	२३
८.	दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०३.२०२१ रोजीपर्यंतचा वादीचा बुलढाणा अर्बन को.क्रे.सो.लि. बँकेचा खातेउतारा	२६
९.	दि.१०.०२.२०२१ ते ३१.०३.२०२२ रोजीचा वादीचा मकापुर अर्बन को.ऑ.बँक लि. खातेउतारा	२७
१०.	भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५ ब अन्वये देण्यात आलेले दोन प्रमाणपत्रे	२८ व २९

<u>**का र ण मि मां सा**</u>

<u>मुद्दा क्र.१ ते ४ करिता</u> :-

१०. वरील तिन्ही मुद्यांकरिता एकत्रीत पुरावा आल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन मी एकत्रीत देत आहे.

११. वादीने निशाणी १६ वर स्वतःचा पुरावा सादर करुन दाव्यातील मजकुर पुन्हा नमूद केलेला आहे. प्रतिवादीला समन्सची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी हा सदर प्रकरणात

हजर झाला व त्याने त्याचा लेखी जबाब निशाणी क्र.४० कडे दाखल केला. वादीने तिच्या पुराव्यात प्रतिवादीने हर्राशीमध्ये कर्जदार शैला बादल हिचा पुणे येथील प्लॉट ४ लाख रुपये किमतीत दिल्या जाईल असे सांगितल्यावरून वादीने बुलढाणा अर्बन को.के.सो.मलकापुर मार्फत टप्पयाटप्पयाने वेळोवेळी ३ लाख रूपये व मलकापुर अर्बन को.ऑ.बँक मार्फत १ लाख असे एकूण ४ लाख रूपये रक्कम प्रतिवादीस एन.एफ.टी.द्वारे दिल्याचे कथन केले.

१२. सदर ४ लाख रक्कम देण्याच्या अनुषंगाने वादीने अभिलेखावर निशाणी क्र.२६ कडे तिचे बुलढाणा अर्बन को.क्रे.सो.लि.बुलढाणा मलकापुर शाखा येथील तिचे बँक खाते २३/१७ या बचत खात्याचा दि.०१.०४.२०२० ते ३१.०३.२०२१ पर्यंतचा खातेउतारा सादर केलेला आहे. तसेच सदर खातेउता-यातील मजकुर खरा व बरोबर असल्याच्या अनुषंगाने भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५ ब अन्वये प्रमाणपत्र निशाणी क्र.२८ कडे सादर केले आहे. त्याचप्रमाणे वादीने अभिलेखावर निशाणी क्र.२७ कडे तिचे मलकापुर अर्बन को. बँक, मलकापुर येथील तिचे बँक खाते ०००११००१००२५६८४ या खात्याचा दि.०१.०२.२०२१ ते ३१.०३.२०२२ पर्यंतचा खातेउतारा सादर केलेला आहे. तसेच सदर खातेउता-यातील मजकुर खरा व बरोबर असल्याच्या अनुषंगाने भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५ ब अन्वये प्रमाणपत्र निशाणी क्र.२९ कडे सादर केले आहे.

१३. प्रस्तुतच्या निशाणी क्र.२६ व २७ कडील खातेउता-याचे अवलोकन केले असता वादीने प्रतिवादीस वेळोवेळी त्यास बुलढाणा अर्बन को.ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी, मलकापुर मार्फत दि.२४.११.२०२० रोजी ५० हजार, दि.०१.१२.२०२० रोजी ५० हजार, दि.०४.१२.२०२० रोजी ४० हजार, दि.०८.१२.२०२० रोजी २५ हजार, दि.१४.१२.२०२० रोजी २५ हजार, दि.२१.१२.२०२० रोजी ५० हजार, दि.२९.१२.२०२० रोजी ३० हजार, दि.०४.०१.२०२१ रोजी २० हजार, दि.२०.०३.२०२१ रोजी १० हजार व तसेच मलकापुर अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक, शाखा मलकापुर मार्फत दि.१०.०२.२०२१ रोजी १ लाख असे एकूण ४ लाख रूपये एन.एफ.टी.द्वारे दिल्याचे स्पष्ट आहे.

१४. पुढे वादीने तिच्या पुराव्यात बँकेमध्ये हर्राशीमध्ये होत असलेला प्लॉट वादीच्या नावे एप्रिल २०२१ मध्ये करून घेण्याचे आश्वासित केले. परंतु कोरोना परिस्थीती असल्यामुळे प्लॉट हा तिच्या नावाने करता येत नसल्याचे प्रतिवादीने सांगितले. म्हणून वादीने तो प्लॉट तिच्या नावाने करून देण्यात यावा अथवा तिने दिलेली ४ लाख रूपयांची रक्कम परत करण्यात यावी असे म्हटले असता प्रतिवादीने दिलेल्या रक्कमेपोटी रक्क्म परत करण्यासाठी त्याचे फेडरल बँक शाखा, शिवाने, पुणे या बँकेचे दि.३०.०९.२०२१ रोजीचे धनादेश क्र.०६६०२५ व दि.१५.१०.२०२१ धनादेश क्र.०६६०२६ असे प्रत्येकी ८० हजारांचे दोन धनादेश वादीस दिले असता सदर दोन्ही धनादेश हे प्रतिवादीच्या खात्यात पुरेशी रक्कम उपलब्ध नसल्याकारणामुळे अनादरित झाल्याचे कथन केले आहे. या अनुषंगाने वादीने अभिलेखावर दि.३०.०९.२०२१ व १५.१०.२०२१ रोजीचे दोन अस्सल धनादेश अनुक्रमे निशाणी क्र.१७ व १९ कडे दाखल केले असून सदर दोन्ही धनादेश हे अनादरित झाल्याबाबत अभिलेखावर अस्सल चेक रिर्टन मेमो अनुक्रमे निशाणी क्र.१८ व २० कडे दाखल केले आहेत. प्रस्तुतचे निशाणी क्र.१८ व २० कडील अस्सल चेक रिर्टन मेमोचे अवलोकन केले असता असे दिसते की, ज्यावेळी निशाणी क्र.१७ व १९ कडील धनादेश हे वटविण्याकरिता वादीने तिची बँक जिजामाता महिला नागरी सहकारी बँक लि.बुलढाणा शाखा मलकापुर येथे जमा केले असता ते धनादेश प्रतिवादीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे अनादरित झाल्याचे दिसून येते.

१५. प्रतिवादीने निशाणी क्र.४० कडे लेखी जबाब सादर केला असून त्याने दिलेल्या लेखी जबाबाप्रमाणे वादीच्या मुलींना पैशाची अडचण असल्यामुळे तिने वेळोवेळी प्रतिवादीकडे मदत मागितली असता त्याने वादीस पैशाच्या रोख स्वरूपात आर्थिक मदत केली असून तेच पैसे वादीने प्रतिवादीस दाव्यात वादीने कथन केल्याप्रमाणे टप्पयाटप्पयाने परत केले आहेत. या ठिकाणी येथे नमुद करणे उचित होईल की, प्रतिवादीने वादीला अडचण असल्यामुळे पैशाच्या स्वरूपात आर्थिक मदत केल्याच्या अनुषंगाने कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केला नाही अथवा त्या अनुषंगाने स्वतःला किंवा एखाद्या साक्षीदारास देखील तपासले नाही. त्यामुळे अशा परिस्थीतीत प्रतिवादीने त्याच्या लेखी जबाबात घेतलेल्या सदर बचावास

कोणतेही पाठबळ प्राप्त होत नाही.

१६. प्रतिवादीमार्फत वादीच्या घेण्यात आलेल्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्याचा असाही बचाव दिसून येतो की, वादीने तिच्या दाव्यात सदर प्लॉट हा कोणत्या शिवारात आहे, त्याचा जमीन गट क्रमांक व प्लॉट क्रमांक, त्याचे सविस्तर वर्णन व चर्तुःसीमा काय आहे हे दाव्यात नमुद केलेले नाही. तसेच वादीने सदर प्लॉटचे सौदेपावती करारनामा दाव्यात जोडलेला नसल्याचे मान्य केल्यामुळे वादीने दाव्यात नमुद केल्याप्रमाणे असा कोणताही हर्राशीचा व्यवहार प्रतिवादीने वादीसोबत केल्याचे म्हणणे आहे. वादीने दाव्यात नमुद केल्याप्रमाणे व प्रतिवादीने वादीचा घेतलेल्या उलटतपासावरून वादी ही प्रतिवादीस ओळखत होती हे स्पष्ट आहे. याशिवाय, दिवाणी दाव्यात अभिलेखावर आलेला पुरावा हा संभाव्यतेच्या प्रबलतेवर ग्राह्य धरल्या जावू शकतो व त्यात कठोर / ठोस पुराव्याची आवश्यकता लागत नाही. त्यामुळे अभिलेखावर आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता वादीच्या पुराव्याची प्रबलता अधिक संभाव्य वाटते. याशिवाय, या ठिकाणी इथे नमुद करणे उचित होईल की, जरी वादीने तिच्या दाव्यात प्लॉट कोणत्या शिवारात आहे, त्याचा जमिन गट क्रमांक व प्लॉट क्रमांक, त्याचे सविस्तर वर्णन व चर्तुःसीमा काय आहे या बाबी जरी नमुद केल्या नसल्या तरी वादीने प्रतिवादीस हर्राशीमधील प्लॉट विकत घेण्याकरिता ४ लाख रूपयांची रक्कम दिली नाही असे म्हणता येणार नाही.

१७. एकंदरीत अभिलेखावर आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, वादी व प्रतिवादी हे एकमेकांना ओळखत असून प्रतिवादीने वादीस शैला बादल यांचा हर्राशीमध्ये प्लॉट ४ लाख रूपये किंमतीला घेण्याचे विनंती केली असता त्यावर विश्वास ठेवून वादीने वेळोवेळी तिचे खाते असलेल्या बुलढाणा अर्बन को.क्रे.सो.मलकापुर व मलकापुर अर्बन को.ऑ.बँक शाखा, मलकापुर बँकेतून एकूण ४ लाख रूपये प्रतिवादीस एन.ई.एफ.टी.द्वारे दिल्याचे स्पष्ट होते. तसेच हर्राशीमधील प्लॉट वादीच्या नावावर न होऊ शकल्यामुळे वादीने तिची रक्कम परत मागितली असता त्या रक्कमेपोटी प्रतिवादीने त्याचे खाते असलेल्या फेडरल बँक शाखा, शिवानी, पुणे या बँकेचा

दि.३०.०९.२०२१ व १५.१०.२०२१ रोजीचे असे दोन प्रत्येकी ८० हजाराचे धनादेश वादीस दिले असता ते दोन्ही धनादेश अनादरीत झाल्याचे देखील अभिलेखावरून स्पष्ट होते. या ठिकाणी येथे नमुद करणे उचित होईल की, केवळ सदर दोन्ही धनादेश हे अनादरित झाल्यानंतर वादीने त्यावर परक्राम्य संलेख अधिनियमचे कलम १३८ प्रमाणे कार्यवाही केली नाही म्हणून प्रतिवादीचे वादीस देणे लागत नाही असे म्हणता येणार नाही.

१८. याशिवाय, प्रतिवादीने त्याच्या निशाणी क्र.४० कडे दाखल केलेल्या लेखी जबाबावरून प्रतिवादीने वादीस पैशांची अडचण असल्यामुळे त्याने तिला पैशांची रोख स्वरूपात आर्थिक मदत केल्याचे म्हणणे असून त्या अनुषंगाने प्रतिवादीने कोणताही पुरावा सादर केलेला नाही. तसेच प्रतिवादीने वादीस नेमकी किती रूपयांची आर्थिक मदत केली व ती केव्हा केली याबाबतही त्याच्या लेखी जबाबात उल्लेख नाही. त्यामुळे प्रतिवादीने सदर घेतलेल्या बचावाचे खंडन केलेले नाही हे स्पष्ट होते.

१९. वरील सर्व पुराव्याचे व सादर कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादीच्या पुराव्यावर अविश्वास ठेवावा अशी कोणतीही वस्तुस्थीती समोर येत नाही. त्यामुळे प्रतिवादी हा वादीचे रक्कम रूपये ४,००,०००/- देणे लागतो. सबब, ती रक्कम प्रतिवादी कडून वसूल होउन मिळण्यास वादी पात्र राहते. वादीने रक्कम रुपये ४,००,०००/- वर द.सा.द.से. १२ टक्के व्याज दाराची मागणी केलेली आहे. परंतु वादीने दाव्यात व अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून त्यांच्यात ओळख असल्यामुळे हर्राशीमधील प्लॉट विकत घेण्याकरिता रक्कम प्रतिवादीस दिल्याचे दिसते. वादीचे कथन नाकारण्यास कोणतेही सबळ कारण अभिलेखावरून दिसून येत नाही. वादीने सदर ४ लाख रूपयांची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेत मुदतठेव पावतीच्या स्वरूपात जमा ठेवले असले तरी तिला प्रचलित बँक व्याजदाराने सर्वसाधारणपणे म्हणजे द.सा.द.शे. ७% व्याज दराने मिळाले असते. सबब, अशा परिस्थीतीत वादी ही सदर रक्कम द.सा.द.शे. ७% व्याज दराने मिळण्यास पात्र राहते. थोडक्यात वादीने तिचा दावा सिध्द केलेला आहे. सबब, दावा खर्चासह अंशतः मंजूर होण्यास पात्र राहतो. करिता मी मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर **होकारार्थी**, मुद्दा क्र.३ चे उत्तर **नकारार्थी** व मुद्दा क्र.४ चे उत्तर **अंशतः होकारार्थी** देउन मुद्दा

क्र.५ करिता खालील आदेश पारित करीत आहे:-

<u>आदेश</u>

१. दावा खर्चासह अशंत: मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने वादीस रक्कम रुपये ४,००,०००/- वादीस २ महिन्याच्या आत द्यावेत. तसेच सदर रकमेवर प्रतिवादीने वादीला द.सा.द.शे. ७ % दराने व्याज दावा दाखल तारखेपासून ते सदरची रक्कम त्याला मिळेपर्यंत दयावे.

३. येणेप्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.08.01 17:29:42 +0530

ठिकाणः- मलकापुर
दिनांकः- ०१/०८/२०२६

(पी.एस.ठाकरे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मलकापुर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same, word to word, as per the original Judgment.	
Court	J.M.F.C. Court No.1, Malkapur
Name of Steno	A.B.Shinde
Date	01.08.2026
Judgment signed by the presiding officer on	01.08.2026
Judgment uploaded on	01.08.2026